# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक १८/०६/२०२४ (मंगळवार) सायंकाळ

---

### सोन्याचांदीचे दागिने चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे काटोल अंतर्गत पंचवटी काटोल येथे दि. १७/०६/२०२४ चे ००.१२ वा. ते ०१.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. विजया मिलीद सरदार वय ५९ वर्ष रा. पंचवटी काटोल व तिची मुलगी तसेच इतर नातेवाईकांसह फिर्यादीच्या मुलाचे साळयाचे लग्न कार्यालयाकरिता स्वात:चे गाडी तसेच उदय सुरजुसे रा. पेठबुधवार काटोल याची भाडयाने केलेल्या गाडीने संभाजी नगर येथे गेले होते. तेव्हा फिर्यादीच्या मुलीने लग्नामध्ये फिर्यादीची २६ ग्रॅम सोन्याची पोत व ९ ग्रॅम सोन्याचे लॉकेट असलेली किंमती १,२४,२२७/— रू. पोत गळयात घातली होती. लग्न कार्य आटपुन फिर्यादी व फिर्यादीची मुलगी तसेच नातेवाईक परत काटोल येथे येत असता फिर्यादीचे मुलीने गळयात घातलेली पोत तिच्या जवळ असलेली बॅग मध्ये ठेवली होती व ती ड्रायव्हरच्या आर्मरेस्टवर ठेवली होती. फिर्यादी ही काटोल येथे आपल्या राहते घरी आली व बॅग मधील पोत पाहीली असता फिर्यादीला ती दिसली नाही तरी फिर्यादीने सर्व घरात तसेच नातेवाईकाच्या बॅग मध्ये पाहीले असता ती पोत दिसली नाही. फिर्यादीची २६ ग्रॅम सोन्याची पोत व ९ ग्रॅम सोन्याचे लॉकेट असलेली किंमती १,२४,२२७/— रू. पोत किरायाने नेलेली संशयित आरोपी एअरटिका कार चालक उदय सुरजुसे रा. पेठबुधवार काटोल याने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रीपोर्ट वरून पोस्टे काटोल येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भांदवि अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि गोंगले हे करीत आहे.

## अवैध रेतीचा साठा करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## एकुण १,३०,०००/— रूपयाचा मुद्‌देमाल जप्त

पोस्टे देवलापार अंतर्गत दिनांक १६/०६/२०२४ रोजी मौजा लोधा शिवार येथे आरोपी कमलेश रेवाराम केवटे, वय ४५ वर्ष रा. लोधा ता. रामटेक जि. नागपुर हा त्याचे ताब्यातील साठा करुन ठेवलेले १२ ब्रास रेती व घराचे समोर अंगनात १० ब्रास रेती साठा, घराचा मागे बाजुला २० ब्रास रेती, जुना घरचा मागे १० ब्रास रेती असा एकुण ५२ ब्रास रेती साठा किंमती २५००/—रु प्रमाणे, उत्खनन करुन विनापरवाना अवैधरित्या कोणतीही शासकिय रॉयल्टी (परवाना) न बाळगता रेती चोरी करुन आपल्या घराभोवती साठा करुन ठेवल्याचे मिळुन आल्याने ५२ ब्रास रेती एकूण किंमती अंदाजे १,३०,०००/— रु असा मुद्येमाल जप्त करण्यात आला. आरोपी यांचेविरुद्ध कलम ३७९ भा.द.वी. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ अन्वये पो. स्टे. देवलापार येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे देवलापार येथील ठाणेदार यांचे नेतृत्वात त्यांचा स्टाफ यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर